MHYA130012902025

दाखल तारीख – ११/०९/२०२५
नोंदणी तारीख – १२/०९/२०२५
निकाल तारीख – १२/०६/२०२६
कालावधी – **००व. ०९म.००दि.**

**दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), दिग्रस, ता.दिग्रस,**
**जि. यवतमाळ यांचे न्यायालयात.**
**(पिठासिन अधिकारी बा. ना. गोडबोले यांचे समक्ष)**

**नियमीत दिवाणी दावा क्र. ७७/२०२५** **निशाणी क्र.१३**

शेख मोबीन शेख इसराईल,
वय–२६ वर्ष, धंदा– मजुरी,
रा. कलगाव, ता. दिग्रस
जि. यवतमाळ. ... **वादी**

**–वि रु ध्द–**

अमरिन शेख मोबीन,
वय–२२, धंदा– टेलरींग व घरकाम,
रा. ह. मु. शे. हकीम भंगारवाले यांचे घरी,
छ. शिवाजी चौक, चमेडीया नगर, यवतमाळ
ता., जि. यवतमाळ. ... **प्रतीवादी**

**दावा–** **वैवाहिक संबंध पुर्नस्थापीत होउन मिळण्याकरीता.**

.............................................................................................

वादीतर्फे वकिल – श्री. मोहसिन मिर्झा
प्रतिवादी तर्फे वकिल – एकतर्फा

---------------------------------------------------------------------------------------------

## न्या य नि र्ण य

(दिनांक – १२ जुन, २०२६)

१) प्रस्तुत दावा वादी यांनी त्याचे व प्रतीवादीचे वैवाहीक संबंध पुर्नःस्थापीत करुण मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२) वादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे. वादीच्या म्हणण्याप्रमाणे वादी व प्रतिवादी यांचा विवाह दि. १०/०३/२०२४ रोजी मुस्लीम समाजाच्या चालीरिती प्रमाणे मौजा– वरोरा येथे मस्जीदमध्ये संपन्न झालेला आहे. वादी व प्रतिवादी यांचे एकमेकांवर प्रेम असल्याने कुटूंब मानणार नाही या भितीने त्यांनी नातेवाईकांकडे वरोरा जि. चंद्रपुर येथे प्रेमविवाह केला व लग्नात प्रतिवादीच्या माहेरकडून कोणतेही दहेजदान घेणेदेणे झाले नाही. तसेच वादी यांनी प्रतिवादी हिला इस्लाम धर्मानुसार नगदी रुपये ५,०५१/– मेहर म्हणुन दिले. लग्नानंतर वादी व प्रतिवादी यांच्या कुटूंबानी दोघांच्या विवाहाला मान्यता दिली. तसेच वादी यांच्या वडीलांनी लग्न झाल्यामुळे वादी व प्रतिवादी यांना त्यांच्या घरी कलगाव येथे बोलावुन त्यांचे रिवाजाप्रमाणे स्वागत केले.

३) वादीच्या म्हणण्याप्रमाणे लग्नानंतर प्रतिवादी व वादी घरी आल्यानंतर लगेच तिसऱ्या दिवशी प्रतिवादीच्या इच्छेप्रमाणे ते कुटूंबातुन वेगळे राहत होते. त्यामुळे वादी व प्रतिवादी हे वेगळे राहात असल्याने वादीच्या परिवाराचा कोणताही तिळमात्र हस्तक्षेप वा संबंध नव्हता. परंतु काही दिवसानंतरच प्रतिवादी ही यवतमाळ

सारख्या मोठया शहरात राहणारी असल्याने व तिला माहेरची ओढ जास्त असल्याने तिला कलगाव सारख्या खेडेगावात करमत नव्हते. तसेच वादीस नवीन मोबाईल घेवून द्या व आपण माहेरी जाऊन राहण्याचा तगादा लावून वादीचा मानसिक छाळ करणे सुरु केले. तसेच प्रतिवादी हीची आई दिवसभर प्रतिवादीस फोनवर बोलत राहत होती. वादी हा प्रतिवादीच्या म्हणण्याप्रमाणे ऐकत नसल्याने रागाच्या भरात माहेरी निघून जात होती व एक ते दोन दोन महीने माहेरी राहात होती. वादीच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादी ही लग्न झाल्यापासुन १३ ते १४ महिन्याच्या कालावधीत दोन ते अडीच महिने त्याच्याकडे चांगल्या प्रकारे नांदली व उर्वरीत कालावधीत प्रतिवादी ही माहेरीचं राहाली.

४) वादीच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादी ही वादीपासुन गभवर्ती असतांना ८ महिन्यात माहेरी गेली व दि. ०२/०२/२०२५ रोजी मुलास जन्म दिला. मुलगा झाल्यावर वादी हे प्रतिवादीस पाहण्याकरीता माहेरी गेला व त्यांना आवश्यक ते, खाण्यापिण्याचे साहीत्य, औषधपाणी, उपचाराकरीता काही रक्कम सुध्दा नेवून दिली. तसेच त्यानंतर एक महिन्यांनी वादी हा प्रतिवादी व मुलास घेण्यास गेला असता प्रतिवादीने म्हटले की, मी दोन ते तीन महिण्यानंतर येतो. प्रतिवादीची आई नामे शबानाबी उर्फ शब्बो ही नेहमी प्रतिवादीला चिथावणी देऊन वादी व प्रतिवादीच्या संसारात किटकिट लावत होती. त्यांनतर दि. ०१/०४/२०२५ रोजी वादीने प्रतिवादीला त्याचे घरी कलगाव येथे नांदण्यास आणले. तेव्हा दुसऱ्या दिवशी

म्हणजे दि. ०२/०४/२०२५ रोजी नेहमीप्रमाणे वादी हा कामाकरीता घराबाहेर निघाला त्यावेळी प्रतिवादीने आपल्या भावास फोन लावून बोलवून घेतले आणि लग्नानंतर वादीने दैनंदिन वापरासाठी घरात आणलेले आंदन, सामान, गॅस– शेगडी, दागदागीने व संसारपयोगी सर्व साहित्य घेवून वादी व तिचे घरच्या लोकांना न सांगता निघून गेली. प्रतिवादीला घरी आल्यावर माहित पडले की, प्रतिवादी ही समान घेवून माहेरी निघून गेली. त्यानंतर वादी हा प्रतिवादीला परत नांदण्यास आणण्याकरीता गेला असता प्रतिवादीच्या आई–वडिलांनी त्यांचा अपमान केला. तसेच जर तुम्ही यवतमाळ येथे राहात असाल तरचं आमची मुलगी तुमचे सोबत संसार करेल व वादीला अश्लील शिवीगाळ करुन धमक्या देवून घरातून हकलून दिले.

५) वादीच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादीला नांदायला घेउन येण्याकरिता अनेक वेळा प्रयत्न केला. तसेच त्यानंतर वादीने दि. ०७/०४/२०२५ रोजी त्याच्या वकिला मार्फत प्रतिवादीला नोटिस पाठवून नांदायला येण्याची विनंती केली. तरी देखील प्रतिवादी ही वादीकडे नांदायला आली नाही. उलट वादीविरुध्द पोलिस स्टेशन शहर यवतमाळ येथे खोटी फिर्याद दिली. वादीच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादी ही विनाकारण माहेरी राहून त्याला त्याच्या मुलाच्या प्रेमापासून व वैवाहिक सुखापासून वंचित ठेवून मानसिक त्रास देत आहे. त्यामुळे वादी यांनी प्रस्तुत दावा दाखल करुन त्याचे व प्रतिवादीचे वैवाहिक संबंध पुर्नःस्थापन करुन मिळण्याची मागणी केलेली आहे.

६) प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी हजर नसल्यामुळे सदर दावा प्रतिवादी विरुध्द एकतर्फा चालविण्यात आला आहे.

७) प्रस्तुत दाव्यात वादी यांनी नि. क्र. ८ अन्वये त्याचे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आहे. तसेच प्रस्तुत दाव्यात वादी यांनी नि.क्र. ३ वरील यादी प्रमाणे वादी व प्रतिवादी यांचा निकाहनामा, आपसी समझोता, वादी यांच्या आधार कार्डची छायांकित प्रत इत्यादी दस्त दाखल केले. तसेच प्रस्तुत दाव्यात वादी यांनी नि.क्र. ११ वर विवाह पत्रीकेची मुळ प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. तसेच वादी यांनी नि.क्र. १२ वरील पुरसिस नुसार त्यांचा पुरावा बंद केला आहे. तसेच प्रस्तुत दावा एकतर्फा चालविण्यात आला आहे.

८) अभिलेखावरील सर्व दस्तऐवजांचे तसेच तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले. तसेच वादी यांच्या विद्वान वकिलांचा युक्तीवाद विचारात घेवून, सदर दाव्यातील वाद मुद्यांवर कारणमिमांसेसहीत, मी खालील प्रमाणे निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | वादी हा सिध्द करतो काय की, प्रतिवादी हिने संयुक्तीक कारणा विना त्याचा त्याग केलेला आहे काय? | **होकारार्थी** |
| २) | प्रतिवादी ही सिध्द करते काय की, वादी पासून विभक्त राहण्यास तिला संयुक्तीक कारण आहे काय? | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| ३) | वादी हा मागणी प्रमाणे त्याचे व प्रतिवादीचे वैवाहिक संबंध पुर्नःस्थापीत करुन मिळण्यास पात्र आहे काय? | **होकारार्थी** |
| ४) | काय आदेश व हुकूमनामा ? | **अंतीम आदेशाप्रमाणे** |

**– <u>कारणमिमांसा</u> –**

**<u>मुद्दा क्रमांक १ ते ३ करीता</u> :–**

९) सदरील तिन्ही मुददे एकमेकांशी सलग्न असल्यामुळे ते एकत्रीतरीत्या विचारात घेण्यात येत आहे.

१०) वादी नामे – शेख मोबीन शेख इसराईल यांनी नि.०८ अन्वये त्याचे पुराव्याचे शपथपत्र दाखल केलेले आहे. त्यामध्ये वादी याने दाव्यातील वाद कथनांचा शपथेवर पुर्नःउच्चार केलेला आहे. सदर पुराव्याच्या शपथपत्रातील वादीचे कथन थोडक्यात असे आहे की, त्यांचा व प्रतिवादीचा विवाह 'मुस्लीम' या समाजाच्या चालीरितीप्रमाणे दि. १०/०३/२०२४ रोजी संपन्न झालेला आहे. तसेच सदरील विवाहासंबंधातून उभयतांना एक मुलगा झालेला आहे. वादीच्या म्हणण्याप्रमाणे विवाहानंतर प्रतिवादी ही केवळ दोन ते अडीच महिने त्याच्याकडे चांगली नांदली. त्यानंतर प्रतिवादी ही नवीन मोबाईल घेवून द्या व माहेरी जाऊ राहण्याच्या कारणावरुन वादविवाद करुन त्याला मानसिक त्रास देत होती.

११) वादीच्या म्हणण्याप्रमाणे सदर प्रतिवादी हिने सासरी नांदत असतांना भावासोबत घरातील साहित्य घेवून ती स्वमर्जीने माहेरी निघून गेलेली आहे. तसेच

त्यानंतर त्याने अनेक प्रयत्न करुन देखील प्रतिवादी ही त्याच्याकडे नांदायला आलेली नसून, तिने त्याच्याकडे नांदण्यास स्पष्टपणे नकार दिलेला आहे. वादीच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादी हिने त्याचा माहेरी राहण्याच्या कारणावरुन विनाकारण त्याग करुन, त्याला त्याच्या मुलाच्या प्रेमापासून व वैवाहिक सुखापासून वंचित ठेवले आहे. त्यामुळे सदर वादी याने त्याचे व प्रतिवादीचे वैवाहिक संबंध पुर्नःस्थापन करुन मिळण्याची मागणी केलेली आहे.

**१२)** वादीच्या उपरोक्त नमूद शपथेवरील तोंडी पुराव्यास प्रतिवादी यांनी कुठलेही आव्हान दिलेले नाही. एकंदरीत वादीचा उपरोक्त नमूद शपथेवरील तोंडी पुरावा विना आव्हानीत असल्याचे स्पष्ट होते. असे असले तरी, सदर पुराव्याचा गुणवत्तेवर विचार करणे आवश्यक आहे. वादीने त्याच्या पुराव्यात शपथेवर कथन केले आहे की, प्रतिवादी हिने त्याचा विनाकारण त्याग करुन ती आज रोजी स्वमर्जीने माहेरी राहत आहे. सदर कथन विना आव्हानीत आहे. त्यामुळे वादीच्या सदर विना आव्हानीत शपथेवरील पुराव्यावर अविश्वास ठेवता येणार नाही. त्यामुळे वादीच्या उपरोक्त पुराव्यावरुन प्रतिवादी हिने त्याचा विनाकारण त्याग केलेला असल्याचे सिध्द होते.

**१३)** एकंदरीत वरील कारणमिमांसेचा विचार केला असता, प्रतिवादी हिने विनाकारण वादीचा त्याग करुन त्याला वैवाहिक सुखापासून वंचित ठेवलेले असल्याचे त्याच्या पुराव्यातून सिध्द होते. त्यामुळे वरील कारणमिमांसेस अनुसरुन

वादी हा त्याच्या मागणीप्रमाणे त्याचे व प्रतिवादीचे वैवाहिक संबंध पुर्नःस्थापीत करुन मिळण्यास पात्र आहे. म्हणून वरील कारणमिमांसेस अनुसरुन मुद्दा क्र.१ व ३ चे उत्तर मी होकारार्थी तसेच मुद्दा क्र. २ चे उत्तर मी नकारार्थी नोंदवीत आहे.

**मुद्दा क्र. ४ करीता**

१४) सदर मुद्याच्या निष्कर्षा करीता मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## // आ दे श //

१) प्रस्तुत दावा मंजूर करण्यात येतो.

२) प्रतिवादीस आदेशित करण्यात येते की, आज पासून १ महिण्याच्या आत तीने वादीकडे नांदायला जावे.

३) येणे प्रमाणे हुकूमनामा तयार करावा.

Digitally signed by BALAVIR NARAYAN GODBOLE
Date: 2026.06.12 17:22:56 +0530

ठिकाण – दिग्रस.
दिनांक – १२ जुन, २०२६.

(बा. ना. गोडबोले)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
दिग्रस.